# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २८/०६/२००६ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०६) इतिवृत्त

**बुधवार** दिनांक **२८ जुन २००६** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **सकाळी ११.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. कावडे साहेबराव राणुबा
2. श्री. गवळी रविकांत काशिनाथ
3. श्री. गायकवाड दिलीप नारायण
4. श्री. मुजीब आलमशाह खान
5. सौ. दलाल लता श्रीनिवास
6. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
7. श्री. पांडे विनायक प्रभाकर
8. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
9. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
10. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
11. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
12. श्री. मो. जावेद मो. इसाक
13. श्री. सावंत मधुकर दामोधर
14. हाजी शेरखान अ. रहेमान

**संवाद :**

श्री.त्र्यंबक तुपे : मला आरोग्य विभागाच्या संदर्भात बोलायचे आहे शहरात चिक्न गुनियाची मोठया प्रमाणात साथ चालू आहे आजच्या सभेला मा. आयुक्त उपस्थित नाही आयुक्त आल्यानंतर सभेला सुरूवात करावी. तोपर्यंत सभा तहकूब करावी.

श्री. मधुकर सावंत : मा. आयुक्त आजच्या सभैला उपस्थित असणे आवशक आहे शहरात अनेक साथीचे रोग आहे आयुक्त उपस्थित असल्यास चांगल्या प्रकारे विषय मांडता येईल मा. आयुक्त येईपर्यंत सभा तहकूब करावी.

मा.सभापती : अर्धा तासात मा. आयुक्त येतील. तोपर्यंत सभा अर्धा तासासाठी तहकूब करण्यात येते.

(सकाळी ११.३३ वाजता सभा तहकूब, १२.०५ वा. सभेला पुन्हा सुरूवात.)

श्री. रविकांत गवळी : किमान चार वर्षानी का होईना मा. न्यायालयाच्या आदेशाची अमलबजवणी प्रशासन करीत आहे अतिक्रमण हटाव मोहिम राबवित आहे. प्रशासनाचे अभिनंदन करावेसे वाटते.तसेच मा. सभापती मा. महापौर यांनी सूध्दा सहकार्य केलेले आहे त्यांचेही अभिनंदन करतो. ही मोहिम राबविताना प्रशासकीय अधिकारी सदर ठिकाणी असतात तेथे ते एकटेच असतात म्हणून त्यांना एक सुरक्षा रक्षक देण्याची आवशकता आहे.

श्री. विनायक पांडे : प्रशासनाबरोबरच सर्व नगरसेवक तसेच पदाधिकारी यांचेहीअभिनंदन करतो. कारण नगरसेवक व पदाधिकारी यांनी सूध्दा अतिक्रमण काढण्यासाठी मनापासून साथ दिलेली आहे. शहरात जेथे जेथे अतिक्रमण झालेले असेल ते सर्व काढण्यात यावे.

श्री. मुजीब खान : डी. पी. रोडवर जे अतिक्रमण आहे ते काढले पाहिजे अनेक ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे. कोर्टानेही आदेश केलेले आहे तसेच ओपनस्पेस वरीलही अतिक्रमण हटविण्यात यावे. मोठमोठया दुकाने थाटले आहे ते काढण्यात आलेले नाही मा. आयुक्तांनी या बाबतीत खूलासा करावा. शहर स्वच्छ व सुंदर असावे असे आम्हाला वाटते. गरीबांच्या टप-या हटविल्या जत आहे त्यांचा रोजी रोटीचा प्रश्न आहे. शाळा सूरू झालेल्या आहे पुस्तक विक्रेते पुस्तके विकत आहे पावसाळयानंतर ही कार्यवाही करावी. पावसाळ्यात पार्कींग, ज्या डीपी रोडचा मोबदला दिला, खुल्या जगांवर आपले नांव नाही याबद्दल कार्यवाही करावी.

डॉ. आशा बिनवडे : अतिक्रमण हटाव मोहिम प्रभाविपणे चालू आहे. मा.सभापती तसेच मा. महापौर यांचेही सहकार्य आहे. ही अतिक्रमण मोहिम न थांबविता चालू ठेवावी. ही मोहिम थांबविल्यास पून्हा आपल्यावर अक्षेप येवू शकतात. अतिक्रमण मोठया प्रमाणात वाढत असल्यामूळे नागरी सूविधा देणे कठीण झाले आहे. लोकांना रोजगार मिळातो म्हणून त्याची टपरी हटवू नये असा भाग नाही. नागरीकांना सुविधा देण्यासाठी काही ठिकाणी मार्केट स्थापण्याचा विचार करावा. उदा. त्रिमुर्ती चौकात जे मार्केट आहे ते पाडून मोठे मोर्केट करावे. एकीकडे मोठे मार्केट व्हावे तसेच अतिक्रमण मोहिमही राबविली जवी असे वाटते.जेअतिक्रमण हटविण्यात आले त्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन करते.

श्री.दिलीप गायकवाड : महापालिकेच्या मालकीचे किती ओपन स्पेस आहे व किती जगेवर अतिक्रमण केलेले आहे याचा खूलासा करावा.

सौ. लता दलाल : शहरातील अतिक्रमण मोहिम मोठया प्रमाणात राबविण्यात येत आहे यास सर्वाचे सहकार्य असून शहराचा चेहरा मोहरा बदलत आहे. त्याबध्दल प्रशासनाचे अभिनंदन करण्याचे येते. परंतू टपऱ्या हटविल्या, स्टॉल हटविले. अशी भावना होवू नये की केवळ गरीबांनाच त्रास दिला जतो. यात मोठे अतिक्रमण असतिल, पार्कीगचे असतील भुखंडावरील असतील ते सर्व काढण्यात यावे. कुणाच्याही दबावाखाली येवू नये. खरोखरोच प्रशासनाचे अभिनंदन करते.

श्री.मो.जवेद मो.इसहाक: जी अतिक्रमण हटविण्याची मोहिम चालू आहे खरोखराच शहर सूंदर होण्यासाठी ही कार्यवाही चालू आहे. सर्व पदाधिकारी नगरसेवकांचे यास सहकार्य आहे त्याचा मी सन्मान करतो. परंतू याच बरोबर मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहे की डी. पी रोड वरील जे अतिक्रमण असतील ते हटवावे. गरीबांच्या टपऱ्या हटविल्या जते परंतू मा. न्यायालयाचे आदेशाची अमलबजवणी प्रशासन करीत नाही याचे कारण काय? शहर बस वाहतुकीसाठी जे बस थांबे झालेले आहे ते अतिक्रमणात येतात. नगर रचना नियमानूसार बांधलेले नाही.हे प्रशासनानेच स्वत: अतिक्रमण केलेले आहे. या बाबतीत प्रशासनावर सूध्दा कार्यवाही करावी अशी माझी मागणी आहे. गरीबाच्या बपऱ्या काढल्या जत आहे. त्या लोकांना बेरोजगार केले जत आहे.मोठे अतिक्रमण तसेच आहेत.

मा.सभापती : जेबस स्टॉप बांधण्यात आले ते अतिक्रमणात येतात का, मा. आयुक्त यांनी खूलासा करावा.

मा.आयुक्त : बस स्टॉप हे अतिक्रमण म्हणणे चुकीचे आहे. महानगरपालिकेच्या मालकीचा रस्ता आहे. महानगरपालिकेच्या जगेवर अतिक्रमण नसते अतिक्रमण हे दुसऱ्याच्या जगेवर असते. रस्त्यावर बस स्टॉप आहे तर रस्ता ही महापालिकेच्या मालकीचा आहे.

श्री.मो.जवेद मो. इसहाक: फुटपाथवर टपरी असेल तर अतिक्रमण बसस्टॉप असेल तर अतिक्रमण नाही का? बस स्टॉप तसेच रिक्षा स्टॅण्ड जर करायचे असेल तर ते नगररचना नियमानूसार करावे लागते. परंतू तसे झालेले नाही. फुटपाथच्या मागे हे बांधकाम यावयास पाहिजे. यात प्रशासनाने मोठी चूक केलेली असून लाखो रूपये खर्च केलेले आहे. गरीबांच्या टपऱ्या

काढल्या जतात शहर सूंदर करायचे ध्येय ठेवतो परंतू महानगरपालिकेचे अधिकारी स्वत: अतिक्रमण करीत आहे तर त्यावेवर कार्यवाही करणार की नाही.

मा.आयुक्त :बसस्टॉप हे अतिक्रमणात येते असे म्हणणे चूकीचे आहे. दुसऱ्याच्या मालकीच्या जगेवर महापालिकेने बांधकाम केले तर अतिक्रमण होवू शकते. अनधिकृत बांधकाम होवू शकते परंतू अतिक्रमण होवू शकत नाही. महापालिकेच्या जगेवर परवानगी न घेता दुसऱ्या व्यक्तीने बांधकाम केले तर ते अतिक्रमण होते. बसस्टॉप हे अतिक्रमण आहे हे म्हणणे बरोबर नाही. अनधिकृत आहेत त्या बाबतीत सांगू इच्छितो की फुटपाथवर बांधण्यास अनुज्ञेय आहे. फुटपाथवर केले तर थ्रू ॲण्ड थ्रू असायला पाहिजे तसेच डिसीआर मधे क्लिअेर आहे की आयुक्तांना वाटत असेल तर नियम ६.६ च्या अंतर्गत थोडे एफएसआय सोडून बाकी बाबी जनहित लक्षात घेऊन सवलत देता येते. फुटपाथवर असेल तर ते नगररचना नियमात तसेच प्रिंसीपल मधेही बसतात.

श्री.मो.जवेद मो.इसहाक: माझ्या माहिती नूसार जेबसस्टॉप बांधकाम करावयाचे असेल तर ट्रॉफिक विभागाचे नगररचना विभागाचे वाहतूक व दळणवळण शाखा असते त्यांच्या शिफारशीनुसार करावयास पाहिजेपरंतू तसे झालेले नाही.

मा.आयुक्त : ट्रॉफिक विभागाची एनओसी लागत असेल.

श्री.मो.जवेद मो.इसहाक: एनओसी ही वेगळी बाब आहे. ट्रॉफिक विभाग वेगळा नकाशा तयार करून देते. त्यानूसार बांधकाम होणे गरजेचे आहे.

मा. सभापती : या बाबतीत जर काही नियमाचे उल्लंघन होत असेल तर ते होवू नये याची काळजी घ्यावी.

श्री. त्र्यबंक तूपे : अतिक्रमण हटविण्यासाठी सर्वानी सहकार्य केले सर्वांचे मी अभिनंदन करतो. शहरात जे महापालिकेचे २१८ भूंखंड आहे त्यावरही अतिक्रमण असेल तर तेही काढण्यात यावे..व महापालिकेच्या ताब्यात घ्यावे. अतिक्रमण मोहिम राबविण्यास आम्ही सर्व सदस्या प्रशासना बरोबर आहे.अतिक्रमण काढतांना प्रशासकीय अधिकारी यांना संरक्षण देण्यात यावे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : अतिक्रमण हटविल्या बध्दल मी प्रथमत: अभिनंदन करतो धन्यवाद देतो व दिलगिरी व्यक्त करतो. काही ठिकाणी अतिक्रमण काढण्यास नगरसेवकांची विरोध केलेला आहे त्यांना नोटीस दिलेल्या होत्या. कार्यवाही चालू आहे. परंतू आम्ही सांगतो त्या ठिकाणचे अतिक्रमण काढले जत नाही.अशा अधिकाऱ्यावर काय कार्यवाही करणार आहे. उस्मानपूरा भागात दुधडेअरी साठी जगा दिलेली आहे. तेथे टपऱ्या टाकून लोकांकडून रू.७००/-भाडे वसूल केले जते. त्या टपऱ्या आतापर्यत काढण्यात आलेल्या नाही. तसेच द्वारकापूरीमधे एक ओपन स्पेस आहे. तेथे शिंदे नावाचे व्यक्ती यांनी तार कंपांऊड करून तो स्वत:च्या गाडया तेथे लावतो. या संदर्भात अनेक वेळा सूचना देवूनही कार्यवाही केलेली नाही. तसेच मुथीयान कॉर्नरमधे श्री. घोरपडे नावाचे व्यक्ती यांनी महापालिकेच्या जगेचा एक भूंखंड हडप करण्याचा प्रयत्न केलेले आहे. तेथे काम चालू आहे व असे सांगितले जते की महापालिकेनीच त्यांना जगा दिली आहे. स्थायी समितीत तसा ठराव घेतला आहे. शहरात अनेक ठिकाणी अतिक्रमणे होत आहे अधिकाऱ्यांना सांगून सूध्दा कार्यवाही होत नाही. याचे कारण काय याचा खूलासा करावा. सांगितलेल्या ठिकाणचे अतिक्रमण काढले गेले पाहिजे अशी विनंती आहे. स.सदस्यांनी अतिक्रमण काढण्याची सूचना दिली तर त्याची पूर्तता करावी.

मा.सभापती : प्रशासनातर्फे होत असलेली कार्यवाही स्तुत्य आहे. अभिनंदनही करण्यात येते. हे शहर सुंदर व्हावे ही सर्वांचीच अपेक्षा आहे म्हणून ही कार्यवाही प्रशासन करीत आहे ती अतिशय अभिनंदनीय आहे. ज्या सुचना स.सदस्यानी केलेल्या आहेत त्याची प्रशासनाने अमलबजवणी करावी. जे काही अतिक्रमणे झालेली असतील खुल्या

जगेवरील अतिक्रमणे असतील, एकत्रित सर्व्हे करून अतिक्रमण काढणेची कार्यवाही करावी.

श्री.मो.जवेद मो.इसहाक: मागील बैठकीत मी वार्ड **फ** मधील भ्रष्टाचारा संबधी बोललो होतो. लोकांचा मेहनतीचा पैसा एका कर्मचाऱ्यानी हडप केला. त्यांचेवर काय कार्यवाही केलेली आहे याचा खूलासा करावा त्या संबधी ऑडीट व्हावे म्हणून मागणी केली होती तोही खूलासा करावा.

मुख्य लेखा परिक्षक : मागिल बैठकीत दिलेल्या सूचनेनूसार वास्तविक पाहता वार्ड फ हे वार्षिक कार्यक्रमामधे ऑडीटसाठी सूरूवातीलाच घेतलेले आहे. १.५.२००६ पासून तेथे ऑडीटही सूरू आहे. त्यानंतर सभागृहाने दिलेल्या सूचना मा. आयुक्तांनी मला कळविलेले होते. की ऑडीट करून अहवाल सादर करावा म्हणून. पावती पुस्तकाची ऑडीटची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. त्या बाबतचा अहवाल मा. आयुक्त व मा. सभापती यांना दिलेला आहे. त्या बाबतीची पूढील कार्यवाही प्रशासन करीत असेलही . त्यानंतर फक्त या विभागाकडून डिमांड रजिष्टर पोस्टीग करावयाचे आहे. साधारणत दोन तीन दिवसात कामकाज संपणार आहे. जे अपहार झालेला आहे तो ६.२७,०६१ रूपये चा आहे. तो कुठल्या पध्दतीने झालेला आहे कसा झालेला आहे व कशामधे केलेला आहे या बाबतचा सविस्तर अहवाल मा.आयुक्त व मा. सभापती यांना दिलेला आहे. लेखा परीक्षण या महिणा अखेर पूर्ण होणार आहे त्या बाबतचा सविस्तर अहवाल जूलै महिण्यात सादर करण्यात येईल.

श्री.मो.जवेद मो.इसहाक: जे ऑडीट झाले आहे त्यात जे आकडे दाखवले ते ६.२७ लाखापेक्षा जस्त आहे. असे माझे मत आहे. जी रक्कम सांगितली त्यापेक्षाही जस्त रक्कमेचा अपहार झालेला असावा. या प्रकरणात एक कर्मचारी सामील नसून आणखी कर्मचारी असतील. तेथील अधिकारी हे सूध्दा तितकेच जबाबदार आहे. जे सामील असतील त्याची सर्वांची नावे जनतेसमोर यावी जनतेचा मेहनतीचा हा पैसा आहे. जेवढे कर्मचारी यात सामील आहे त्यांचेवर चोरीचा गुन्हा दाखल करावा.

मा.सभापती : या संबधी काय कार्यवाही केलेली आहे याचा खुलासा करावा.

सहायक आयुक्त-१ : वार्ड फ मधे रूपये १,६७,११६/- चा अपहार झालेला आहे असा रिपोर्ट १.४.२००६ रोजे संबधीत वार्ड अधिकारी यांनी दिला होता. त्यानूसार कार्यालयातर्फे संबधीतास दिनांक ४.४.२००६ रोजे कारणे दाखवा नोटीस देवून त्याचे उत्तर संबधीतांनी २०.५.२००६ रोजे दिले. जे रोखपाल होते विजय वाघमारे यांना निलंबीत करण्यात आले.मध्यतंरी ऑडीटचे काम चालू होते. आणखी रक्कम निघते का म्हणून थांबलेलो होतो.

सौ. लता दलाल : नोटीस दिल्यानंतर १ महिना २० दिवसानी उत्तर आले तोपर्यत ते कामावर होते का ?

सहा. आयुक्त-१ : या काळात ते नोकरीवर होते.

सौ. लता दलाल : ही पध्दत चूकीची आहे जेव्हा एखादा कर्मचारी भ्रष्टाचार करतो तो कर्मचारी त्या पदावर कार्यरत राहतो व खूलासा करतो हे बरोबर नाही. अशा वेळी संबधीत कर्मचारी सर्व पूरावे नष्ट करू शकतो.

मा. सभापती : जे कूणी दोषी असतील त्यांचेवर मा. आयुक्त यांनी स्वत: कार्यवाही करावी. कारणे दाखवा नोटीस न देता ताबडतोब कार्यवाही करावी.

श्री.मुजीब खान : वार्ड क मधे रजिष्टर फाटलेले होते त्या संबधी काय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

मा. सभापती : या संबधी खूलासा करण्यात यावा.

सहा. आयुक्त -१ : वार्ड क च्या संदर्भात स. सदस्यांनी ६.१.२००६ रोजे पत्र दिले होते. नोटीस वगैरे देवून वार्ड पातळीवर कार्यवाही केली व आणि वार्ड मार्फत त्यांचा अहवाल जे मूद्दा बैठकीमधे निघाला त्यानंतर आमच्याकडे आला. त्या अहवालात असे दिले की अे.

आर. खान हे दोषी आहेत. दोन पाने त्यातील फाडलेली होती. त्यातील रक्कम ही ४२,३७०/-रूपये एवढी रक्कम होती. या संदर्भात श्री. खान यांना निलंबीत करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

श्री. मुजीब खान : यामधे श्री.अे.आर. खान हे एकच कर्मचारी दोषी नाही. यात अधिकारी तसेच जेबूक फाटलेले आहे त्याची वसूली करणारे खालचे कर्मचारी आहेत. एकाच व्यक्तीला दोषी ठरवून पैसे भरण्याचे सागंत आहे. एका व्यक्तीस ५०,५५० ची पावती व महापालिकेच्या रेकॉर्डवर ५५० ची पावती, एकाच कर्मचाऱ्यास कोणत्या बेसवर दोषी ठरवित आहेत. चौकशी करावी. सर्वांवर कार्यवाही व्हावी. त्या दोन पानाची वसूली कूणी केली याचा खूलासा झाला पाहिजे

मा. सभापती : सखोल चौकशी करून जेदोषी असतील त्या सर्वांवर कार्यवाही करावी.

श्री.मधुकर सावंत : या सभागृहात चर्चा होण्यापुर्वी अशा कर्मचाऱ्यांना निलंबीत केले पाहिजे मा.आयुक्तांना अधिकार आहे. कलम ५६ नुसार मा.आयुक्त सोडून कोणालाही निलंबीत करण्याचा अधिकार या सभागृहाचा आहे तो वापरावा.

मा. सभापती : पूर्ण चौकशी झाल्याशिवाय कार्यवाही करणे योग्य नाही.

श्री.मुजीब खान : आताच स.सदस्यांनी स्थायी समितीस अधिकार आहे असे म्हटले. परंतु यापुर्वी सर्वसाधारण सभेने सहा.संचालक नगर रचना यांचेवर कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला परंतु ते आज्ही सभागृहात दिसतात. प्रशासन सभागृहाचा मान सन्मान ठेवत नाही. याचा खुलासा व्हावा.

मा. आयुक्त : श्री.राठोड यांचे बाबतीत सर्वसाधारण सभेने निर्णय घेतला होता की, एक तर त्यांना शासनाकडे परत पाठवावे आणि त्यांचेविरूध्द गुन्हा दाखल करावा. गुन्हा दाखल करण्यासाठी सीआरपीसी चे कलम ९६ अन्वये शासनाची परवानगी लागते. शासनास याबद्दल कळवले. तसेच त्यांची बदली करण्या संदर्भात निर्णय झाल्याचे शासनास कळविले आणि ठरावाची प्रत पण शासनास दिली. सर्वसाधारण सभेच्या भावनांचा अपमान होऊ नये म्हणून मी त्यांना रजेवर पाठविले. बदली बाबत शासनाकडून आदेश येतील असे वाटत होते परंतु शासनाकडून आदेश आले नाही. सहाय्यक संचालक नगर रचना हे पद शासन आस्थापनेवर आहे. त्या केडरमधील बदली वगैरे संपूर्ण शासनामार्फत होते. शासनाकडून तसे आदेश आले नाही, वेळ लागू शकतो म्हणून पुन्हा कामावर घेण्यासंबंधी मा.महापौर यांचेशी चर्चा केली व सहमती घेतली.

श्री.त्रिंबक तुपे : प्रशासनाच्या कामात मा.आयुक्तांचे बारीक लक्ष आहे. स.सदस्य सुध्दा मनपाच्या फायद्यासाठी आपले मत मांडत असतात. भ्रष्टाचारा संबंधी बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर मा.आयुक्तांनी तात्काळ कार्यवाही करणे अपेक्षीत असते. दुसरे असे की, मागील वेळेस मी स्पेक या संस्थेच्या सर्वेक्षणासंबंधी, मालमत्ता कराच्या आकारणीबाबत बोललो होतो. काही लोक परस्पर टॅक्स कमी करून आणत आहेत हेही निदर्शनास आणून दिले होते. यासंबंधी खुलासा व्हावा.

कर निर्धारक व संकलक : स्पेक या संस्थेने ७४ हजर लोकांना सुनावणीच्या नोटीसा दिलेल्या होत्या. त्यापैकी ९४०० लोकांनी सुनावणीसाठी हरकती घेतल्या होत्या. वॉर्ड अधिकारी, वॉर्ड इंजिनिअर यांनी सुनावणी घेतलेली आहे. टॅक्स कमी करणयात किंवा दुरूस्त करण्यात आलेला आहे. ६७ हजर लोकांना जे टॅक्स लावलेला आहे त्याचे असेसमेंट वॉर्डनिहाय स्पेककडून माहितीपत्रक मागविलेले आहे व ते उपलब्ध आहे.

श्री.त्रिंबक तुपे : जेटॅक्स कमी केले ते व्हीजेट न करता कमी केले. कार्यालयात बसून कमी करण्यात आले. ते कुणी कमी केले? यासाठी एक कमिटी गठीत करणे आवश्यक होते. प्रत्यक्ष पाहणी करून कर कमी किंवा दुरूस्त करावयास पाहिजेहोतो. पुर्वी जेकर होते तेच कर आकारणी करून दिले.

मा. आयुक्त : नोटीस देण्याच्या पुर्वी मला पूर्ण डाटा दिला होतो. जे ओरीजनल डाटा होता. त्यात किती लोकांचा कर कमी केला, कोणत्या कारणामुळे व कुणी केला याची चौकशी होईल.

श्री. त्रिंबक तुपे : प्रत्यक्ष जयमोक्यावर जऊन तपासणी करून तक्रारी निवारण केले असते तर ते योग्य ठरले असते. त्यात बरेचसे तथ्य आढळले असते.

मा. आयुक्त : जेओरीजनल डाटा नुसार टॅक्स कमी केला असेल तर त्या जगेवर जऊन पुन्हा पाहणी करून कशामुळे कमी झाला हे संबंधीत अधिकारी तपासणी करतील.

सौ.लता दलाल : स्पेक या संस्थेने सर्व्हे केला, सभागृहात वादळी चर्चा झाली. पुन्हा सर्व्हे करण्यात आला. रिसर्व्हेचा टॅक्स किती आला म्हणून नोटीसा दिल्या. मागील सभेत मी चुकीचे कर आकारणी केली म्हणून झेरॉक्स प्रत दिली होती. आता पुन्हा सर्व्हेच्या बाबतीत सूचना केलेल्या आहेत. ज्या वेळेस काही लोक तक्रारी घेऊन माझ्याकडे आले त्यावेळी मी श्री.फड साहेबांना दुरध्वनी केला, त्या व्यक्तीशीही चर्चा करायला लावली. अनेक वेळा सर्व्हे करण्याची वेळ का येत आहे? यासाठी कमिटी गठीत करण्यात यावी. मालमत्ता कर आकारणी संदर्भात उप आयुक्त किंवा स्पेकचे मालक स्वतंत्र निर्णय घेत असतील तर त्यांनी न घेता कमिटीने निर्णय घ्यावा.

मा. सभापती : कर आकारणी संदर्भात आलेल्या हरकतींवर सुनावणी घेण्याचा अधिकार स्पेकला दिला नाही. काही प्रकरणात असे दिसून आले की, स्पेकचे कर्मचारी परस्पर कर कमी करून देत आहेत. या बाबी होऊ नये. कर जस्त आकारला गेला असेल तर प्रशासनाने सुनावणी घ्यावी. अशा प्रकारच्या स्थायी समितीच्या तीन सदस्यांची कमिटी गठीत करण्यात येत असून त्यामध्ये कर निर्धारक व संकलक, स.सदस्य सौ.लता दलाल, श्री.त्रिंबक तुपे व श्री.रविकांत गवळी यांचा समावेश असेल. या समिती समोर सर्व हरकतींची सुनावणी होईल व त्यासंबंधी निर्णय घेण्यात येईल. संबंधीत वॉर्ड कार्यालयात सुनावणीसाठी वेळ निश्चित करण्यात यावा. परस्पर कुणी निर्णय घेत असेल तर ते करू दिले जणार नाही. सामान्य नागरीकांच्या ज्या तक्रारी आहेत त्या वॉर्ड अधिकारी यांनी एकाच ठिकाणी बसून सोडवाव्या.

मा. आयुक्त : हेअरींग वॉर्ड अधिकारी घेत आहे.

मा. सभापती : चुकीच्या पध्दतीने घेत आहे. आताच निर्णय दिलेला आहे त्याप्रमाणे गठीत केलेल्या कमिटी समक्ष सुनावणी घेवून निर्णय घेण्यात यावा. आवश्यक कार्यवाही करावी.

श्री. त्र्यंबक तुपे : सिंधी कॉलनीमधे सर्वेचे काम केलेले नाही तेथील नागरीक सर्वेसाठी येवू देत नाही अशी माझी माहिती आहे.

मा. सभापती : या बाबत प्रशासनाने दखल घ्यावी.

श्री. विनायक पांडे :गेल्या आठ ते दहा दिवसापासून माझ्या प्रभागात व बाजूच्या वार्ड ५ मध्ये ही चिकुन गुनीयाची साथ अतिशय वाढलेली आहे. चिकुन गुनिया नाही म्हणून आरोग्य विभागाचे मतभेद असतील परंतू जेब्लड तपासणीसाठी पाठवले ते तपासणी होवून येण्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागतो, ती घोषणा होण्यासाठी एक वर्ष थांबणार आहात का. मी खाजगी डॉक्टराकडे गेलो होतो त्यांनी चिकुन गुनिया असल्याचे सांगितले आहे व यासाठी महापालिकेने आरोग्य विभागाने कॅम्प लावावे. आपल्या आरोग्य विभागाने ताबडतोब तेथे कॅम्प घेतला त्याबध्दल अभिनंदन करतो. त्या दिवशी तेथे २२८ रूग्ण तपासणी केले होते. ३० ते ३२ लोकांचे सॅम्पल तपासणी साठी पाठविले आहे. २० ते २२ फोगींग मशीन घेतल्या आहे व त्या एक तास चालतात असे अधिकाऱ्याचे म्हणणे आहे. मी प्रत्यक्ष चालू करावयास लावले व अनुभव घेतला तर १५ ते २० मिनिटे ते मशीन चालतात. जेथे चिकुन गुनिया पसरलेला आहे तेथे कहार तसेच कुंभार समाजचे गरीब लोक राहतात. सर्व अंग मेहनतीचे काम करणारे लोक आहे. चिकुन गुनिया

बाबतीत ताबडतोब आरोग्य विभाग माझ्या प्रभागत समाजमंदिरात चालू करावा अशी विनंती आहे.

श्री. मुजीब खान :किराड पूरा भागाचे नगरसेवक एक महिण्यापासून चिकुन गुनियाने पिडीत आहे. दोन तीन बैठकीनंतर ते आजआलेले आहे. माझ्या घरातील तीन लोकांना हा आजर आहे. असे असतांना आरोग्य विभागकडून सांगण्यात येते की चिकुन गुनिया नाही.

श्री.त्र्यंबक तूपे :अनेक लोकांना चिकुन गुनिया आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागाचे असे म्हणणे आहे की चिकुन गुनिया नाहीच. कालच माझ्या वार्डात सर्वे करण्यात आला किमान १०० लोकापैकी १० लोकांना तरी चिकुन गुनिया आहे असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. खाजगी डॉक्टर सांगतात चिकुन गुनिया आहे. वृत्तपत्रात येते. महापालिकेच्या डॉक्टराचे असे म्हणणे आहे की खाजगी डॉक्टरांचा हा स्टंट आहे. ते पैसा कमवितात असे म्हणणे आहे. तसे होत असेल तर त्या डॉक्टरांवर काय ॲक्शन घेणार आहोत. मनपा आरोग्य विभागाने एक निवेदनही वृत्तपत्रात दिले होते की त्यात असे दिले की शुध्द पाणी नेहमी लहान तोड असलेल्या भांडयात साठवावे. आणि ते २४ तासच पिण्यासाठी वापरावे जर वार्डात एक दिवसा आड पाणी येते तर ते ४८ तास होतात. तर आमच्या भागातील लोकांनी आजरी पडायचे का खूलासा करावा.

डॉ. आशा बिनवडे :शहरात तापाचे रूग्ण मोठया प्रमाणात आहे. माझ्या वार्डात किमान घरातील एका व्यक्तीस ताप आलेला होता. आजर कोणता आहे तो महत्वाचे नसून तो होवू नये यासाठी महापालिका जबाबदारी पार पाडण्यास कमी पडत आहे. ओरड करण्यात अर्थ नाही प्रत्यक्षात कार्यवाही होणे गरजेचे आहे. जे त्रास होतो आहे तो सारख्याच प्रकारचा लोकांना होत आहे. मलेरीयाचे रूग्ण असेल तरी ताप येतो. महानगरपालिकेकडे स्वतंत्र मलेरीया विभाग आहे. संपूर्ण यत्रंना आहे. संबधीत अधिकाऱ्याना शासनाकडून मोठा पगार मिळातो.असे असतांना महापालिका प्रशासन कूठे कमी पडले याचा अभ्यास करण्याची गरज आहे. परवाच्या दिवशी माझ्या वार्डात मलेरीया विभागाचे काही कर्मचारी फोगींग मशीन घेवून आले होते. संपूर्ण वार्डात फवारणी करण्याचे सांगितलेले होते तो कसा कव्हर करायचा हे मला प्रक्टीकली कळले नाही. दोन तासात त्या कर्मचाऱ्याकडून जस्तीत जस्त दोन कॉलनीमधे फवारणी होवू शकली.त्यानंतर ते कर्मचारी सूध्दा थकले. काम करणे अशक्य झाले. त्या मशीनचे वजन १२ ते १५ किलो असते व ते घेवून त्या कर्मचाऱ्यांना फिरावे लागते व तो किती वेळ फिरू शकतो याचाही विचार होणे गरजेचे आहे. सध्याकाळ पर्यत दोन कॉलनीतच फवारणी केली व नंतर त्यांना रिपोर्ट दयावा लागतो की फवारणी केली. जी औषधी फवारली जतात त्यात पाणी किती औषधाचे प्रमाण कीती गेल्या तीस वर्षापासून तेच एकच औषध वापरले जते तर डासांवर/मच्छरांवर त्याचा काय परीणाम होत असेल.मलेरीया विभागाचे जे प्रमुख आहे त्यांनी वर्षानुवर्ष आतापर्यत काय केलेले आहे कोणते रिपोर्टींग केलेले आहे. वेगळी औषधी खरेदीसाठी महापालिकेसमोर काही प्रस्ताव ठेवलेला आहे का या सर्व बाबीचा खूलासा करावा. चार दोन कर्मचारी पाठवायचे व फवारणी केली म्हणून दाखवायचे असा प्रकार होत आहे. प्रत्यक्षात कोणती औषध त्या मच्छरवर इफेक्ट करणारे नाही. संखया वाढत आहे. कोणताही आजर होण्या आधी खबरदारी घेण्याचे काम महापालिकेचे आहे.

श्री. मिलींद दाभाडे :आरोग्य विभागाकडून चिकुन गुनिया रोग नष्ट करण्यासाठी उपाययोजना होत नाही. गेल्या आठ दहा दिवसापासून आरोग्य शिबीराचे आयोजन केले जत आहे. शिबीर घेण्यापूर्वी वार्डातील नगरसेवक तसेच नागरीकांना त्याची माहिती होणे आवश्यक आहे. वसूलीसाठी जशी भोंगे वाजवून कार्यवाही करतो तसीच कार्यवाही शिबीरासाठी करावयास पाहिजे होती. शिबीरास प्रतिसाद मिळाला नाही. जे खर्च झालेला आहे तो

संबधीत कर्मचाऱ्याच्या पगारातून वसूल करावा.प्रचार झाला नाही तेथे पून्हा आरोग्य शिबीर घेण्यात यावे.

सौ. लता दलाल :महानगरपालिकेकडे नोव्हान व आबेट हे दोन प्रकारचे औषधी द्रव्य फवारणी केले जते .दोन्ही औषधी किती वर्षापासून फवारली जते. ही औषधी वापरू नये असा काही शासनाचा रिपोर्ट आहे का शासनाची अशी सूचना आहे असे माझे मत आहे तरी ही ते नोव्हान औषध वापरले जते. एका १५ लिटर पाण्याच्या टाकीमधे किती औषधी वापरावे, याचाही खूलासा करावा. एक झाकन असे माप टाकतात. त्याचा इफेक्ट काहीच होत नाही. या औषधानी किटकांवर किती परीणाम होतो याचाही खूलासा करावा. नोव्हान व आबेट किती प्रमाणात टाकले जते. तसेच कचरा कुडंयावर किती पावडर टाकली जते याचाही खूलासा करावा..घनकचरा विभागाचे अधिकारी काय कार्यवाही करतात. मलेरीया विभागाचे अधिकारी यांनी सर्व बाबीचा खूलासा करावा.

मा.सभापती :मलेरिया विभागाचे प्रमूख अधिकारी यांनी खूलासा करावा.

श्री. विनायक पांडे :माझ्या वार्डात साथ आहे. हर्सूल कडून जे नाला येतो ड्रेनेज लाईन आहे ती फूटलेली असून पाईप वाहून गेले आहे. ड्रनेजचे पाणी हे सर्व खामनदीमधे पसरले आहे. नाल्याच्या बाजूला ज्ञानेश्वर विदयालय म्हणून शाळा आहे. तेथे १२०० ते १४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संबधीत अधिकारी श्री.पानझडे यांना प्रत्यक्ष सोबत घेवून तेथील स्थळ पाहणी केलेली आहे परंतू काहीही कार्यवाही केलेली नाही.

मा.सभापती : मलेरिया विभागाचे प्रमूख अधिकारी यांनी खूलासा करावा.

जीवशास्त्रज्ञ : जी औषधी फवारणी केली जते ती केंद्र शासनाकडून राज्य शासनास येते व राज्य शासनाकडूनच आल्यानंतर ती फवारणी केली जते आम्हाला अधिकार नाही.

डॉ. आशा बिनवडे : बेजबाबदारपणे उत्तर दिले जत आहे. शासन माती पाठवेल तर माती टाकणार आहात का? जी औषधी फवारणी केली जते त्यामूळे मच्छरांवर इफेक्ट होतो का, काय अडचणी येतात या बाबत शासनास रिपोर्ट केलेला आहे काय, याचाही खूलासा करावा. चांगले वाईट ठरविण्याचा अधिकार नाही परंतू ते इफेक्टीव्ह आहे किंवा नाही हे कळविण्याचा अधिकार आहे.

मा. आयूक्त :जे काही औषधी येतात ती केंद्र शासनाकडून येत असते. संपूर्ण देशात त्या एकाच मेडीसीनचा वापर होतो. परंतू या औषधी मूळे इफेक्टयूव होत नाही असे लक्षात आले नंतर राज्य शासनामार्फत केद्र शासनास कळवायला पाहिजे त्यांना कळावयास पाहिजे की हे इफेक्टीव्ह नाही.

जीवशास्त्रज्ञ : जी औषधी येते ती इफेक्टीव्ह आहे.

डॉ. आशा बिनवडे :इफेक्टीव्ह आहे तर कसे व किती प्रमाणात आहे .हे सभागृहाला कधीच कळविलेले नाही व जेइफेक्टीव्ह औषधी लागते त्याची मागणीही कधी केली नाही.

जीवशास्त्रज्ञ : नोव्हन हे औषध ३० एमएल १० लिटर पाण्यामधे टाकले जते. कर्मचाऱ्याबरोबर मी ही केव्हा केव्हा साईटवर जते. माहिती घेते. चार लीटर डिझेल व एक लिटर पेट्रोल मशीनमधे टाकले जते. एक तास मशीन चालते. शासनाच्या नॉर्म्सनुसार फवारणी होते. खबरदारी घेतली आहे.

मा.आयुक्त :चिकुन गुनिया म्हणा की दुसरा आजर म्हणा परंतु या शहरात वायरस डासांचा आहे. नावाचा काही फरक पडत नाही. सुरक्षात्मक उपाययोजना दिसत नाही.

जीवशास्त्रज्ञ :अशा वेळी १० लीटर पाण्यामधे कधी कधी निकषापेक्षा १०, २० एमएल औषधी वाढवून टाकली जते, प्रमाण वाढविले जते.

मा.आयुक्त :आपले जे प्रव्हेन्टी मेजर्स आहे तो का फेल होत आहे. हे असून पण मॅस्कोटीचे प्रमाण कमी होत नाही. कॅरीयर म्हणून काम करणार कोणत्याच फोगींग मशीन फवारणी करून

ते मच्छर मरणार नाहीत.मास्कोटीची संखया सध्या आपल्या कन्ट्रोल मधे नाही. हे फेल होण्याचे कारण काय वाटते याचा खूलासा करावा.

जीवशास्त्रज्ञ : मनुष्य बळ कमी आहे. १२ लक्ष लोकसंख्येसाठी ८७ कर्मचारी काम करतात. आणखी ५० कर्मचारी आवशक आहे. कर्मचारी वाढवून दिल्यास प्लॅनींग करून डास निर्मितीच्या ठिकाणी फवारणी केली जईल.

सौ. लता दलाल :मा. आयुक्त माहिती घेत असतांनाही अत्यंत बेजबाबदार पणे उत्तर दिले जत आहे. किती वार्डात संबधीत अधिकारी फिरलात याची माहिती दयावी. किती वेळा नगरसेवक अधिकाऱ्या बरोबर होते याची माहिती दयावी. एक तास मशीन चालते कशा वरून सांगतात याचा खूलासा करावा.

जीवशास्त्रज्ञ : सध्या फॉगींग मशीन द्वारे फवारणीची मोहिम चालू आहे. मागिल १२ मे पासून वार्ड कार्यालयाकडे फवारणीचे काम दिलेले आहे. सकाळी ५.३० वाजताच फवारणीचे काम सुरू केले जते त्यावेळी नगरसेवक हे झोपलेले असतात अशा वेळी त्यांना उठवावे की नाही असा प्रश्न पडतो.

सौ. लता दलाल :सकाळी ६ ते ८ या वेळा फवारणी करणे नियमात बसते का? संध्याकाळी ठिक आहे मच्छर बाहेर निघतात. सकाळी ६ वाजता मच्छर बाहेर असतात का?

श्री. मुजीब खान : लोकांचा जीवन मरणाचा प्रश्न आहे. वार्ड क्र ४२ कोठे येतो, त्यामधे कोणता भाग येतो. याची माहिती अधिकारी यांना आहे का? करीम कॉलनी, यूनूस कॉलनी कोणत्या भागात आहे.

जीवशास्त्रज्ञ प्रमुख :सर्वसाधारणपणे सहा वाजता फवारणीला सुरूवात होते. सकाळी फवारणी करणे अयोग्य नाही.

मा. सभापती :आरोग्य विभागाचे जे अधिकारी आहे ते निष्क्रीयपणे बेजबाबदारपणे काम करीत आहे. या बाबतीत मा.आयुक्त यांनी स्वत: या संदर्भात त्यांचे दालनात एक बैठक घ्यावी आणि योग्य ते नियोजन करून द्यावे. नियोजन पध्दतीप्रमाणे काम होते की नाही हे पाहण्यासाठी दोन अधिकाऱ्यांची नियूक्ती करावी. तसेच बेगमपूरा येथे महानगरपालिकेचे जगा आहे तेथे हॉल आहे तसेच रमानगर येथे ही बालाजीनगर येथे ही महानगरपालिकेची जगा आहे तेथे हॉल समाज मंदीर आहे तेथे या ठिकाणी रूग्णाची तपासणी करण्यासाठी तात्पूरती एक दोन डॉक्टराची नियुक्ती करावी. जेथे महापालिकेच्या इमारती आहे तेथे चार पाच दिवसासाठी डॉक्टराची तात्पूरती उपलब्धता करावी. आजच यत्रंना कार्यान्वित करावी.

डॉ. आशा बिनवडे : आता डांस निर्मुलन झाले नाही तर डेंग्यू होण्याची शक्यता आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :शहरातील नागरीकांना कोणताही आजर होवू नये यासाठी मनपाने काय व्यवस्था केलेली आहे. केलेली नसेल तर करावी. माझा वार्डचा अंतर दोन तीन कि. मीटर आहे. साफसफाईसाठी कर्मचारी नाही. एक गाडी कचरा नेण्यासाठी आहे. तीन ते चार दिवस कचरा पडून असतो. कचरा उचलण्यासाठी वाहनाची व्यवस्था करावी तसेच कर्मचारी वाढवावे.

मा.सभापती :जेथे कचरा उचलण्यासाठी वाहन देण्याची गरजअसेल तेथे तशी कार्यवाही करावी.

सौ. लता दलाल :प्रशासनातील अधिकारी कर्मचारी काम करीत असतांना मा. आयुक्ताची त्यांचेवर वचक आहे किंवा नाही हा प्रश्न उभा राहिलेला आहे. कारण अनेक विभागात स. सदस्य पत्र देतात त्याची उत्तरे मिळत नाही. बाधकाम विभागास असा प्रश्न केला होता की या वर्षभरामधे किती डांबरीकरण झालेले आहे. किती कामे झाली आहे किती बाकी आहे. किती स्पीड ब्रेकर केले किती राहिले त्याचे उत्तर मिळालेले नाही.किती ठिकाणी ड्रनेज लाईन टाकलेल्या आहेत त्याचे उत्तर मिळालेले नाही. शहरात किती ठिकाणी अनधिकृत नळ कनेक्शन आहे याची माहिती दिली नाही. सन २००६ पर्यत नगररचना

विभागाने किती बाधंकाम परवानगी दिली त्याची संपूर्ण माहिती मिळाली नाही.मा. आयुक्तांनी प्रत्येक वार्डला व्हिजेट दयावी. वार्ड ड चे खाजगीकरण करायचे म्हणून अनेक मजूर स्वेचछा निवृत्ती घेवून घरी गेले आहे. नवीन मजूर दिले जत नाही. कोणत्याही वार्डात स्वच्छता दिसून येणार नाही. ड्रनेजचे पाणी वाहते. कचऱ्याचे ढिग पडलेले आहे. आरोग्य विभागाची आताच माहिती घेतली. अशा परीस्थितीत साथीचे रोग पसरले तर महानगरपालिकेची जबाबदारी राहील. रस्त्याचे प्रश्न आहे अर्धवट रस्ते झालेले आहे.काम करायचे तर कसे करायचे. प्रशासन कोठे आहे. अधिकारी कर्मचारी किती रजेवर आहे किती टक्के कर्मचाऱ्याना एकाच वेळी रज देता येते. नियमानूसार प्रभारी काम करू शकतात याचे उत्तर मला मिळालेले नाही. यामूळे वार्डातील विकास कामे थांबलेली आहे याची जबाबदारी कोण घेणार आहे. लवकर कामे होत नाही. आम्ही जयचे कुणाकडे आपल्याकडे आल्यावर गर्दी असते.

मा. सभापती : सर्व अधिकारी यांना सूचना करण्यात येते की. स. सदस्यांनी पत्र दिल्यानंतर तीन ते चार दिवसात उत्तर दिले पाहिजे. तसेच मा. आयुक्त यांना भेटण्यासाठी स.सदस्यांना दुपारी ४ ते ५ ही वेळ राहील.

श्री.त्र्यंबक तूपे : आठ दिवसापूर्वी मी पत्र दिले की दिनांक २३.२.२००५ रोजी तीन बसेस नाका चूकवून शहरात आलेल्या आहेत.

मा. सभापती : उपआयूक्त महसूल यांनी खूलासा करावा.

उपआयुक्त(महसूल) : या सदंर्भात प्रशासनाने चौकशी करून श्री. गुरूविंदरसिंग हरविदरसिंग शेटी रा. बायजीपूरा बैसय्येनगर औरंगाबाद येथील रहिवासी आहेत. जे वाहन औरंगाबाद शहरात येतात व या शहरात त्याचा वापर होतो. त्या वाहनावर शेडयूलमधे जे जकात दर आहे तो आकारणी केला जतो. जे वाहने पासींगसाठी शहरात येतात परंतू त्यांचा वापर बाहेर होतो. त्या वाहनावर जे जकात दर आहे त्याचे १० टक्के जकात दर आकारला जतो. सदरच्या व्यक्तीने जे पत्ता प्रशासनास दिला होतो तो मु.पो. घाणेगाव ता. गंगापूर जि औरंगाबाद असा आहे. त्यामूळे सदर वाहनावर एकूण जकात दराच्या १० टक्केच जकात आकारण्यात आली होती. चौकशी केली असता सदर व्यक्ती औरंगाबाद शहरातच राहतात व वाहनाचा वापरही येथेच होतो म्हणून त्या वाहनाची जकात चूकवल्या संदर्भात संबधीत व्यक्तीला एक नोटीस तामील केलेली आहे..आणि ती नोटीस शहरातील मुख्य वर्तमान पत्रात ही प्रसिध्द केली होती कारण अगोदर नोटीस देण्याचा प्रयत्न केला ते व्यक्ती नोटीस घेत नव्हते. नोटीस दिल्यानंतर अधिक कागदपत्र सादर करण्यासाठी संबधीत व्यक्तीने सात दिवसाचा वेळ मागविलेला आहे. संपूर्ण प्रकरण यश मोटर्स मार्फत झालेले आहे असा खूलासा सादर केलेला आहे. सात दिवसात समाधानकारक खूलासा प्राप्त झाला नाही तर संबधीत व्यक्तीकडून साधारणपणे तीन वाहनाचे ३.७४ लक्ष इतका दंड वसूल केला जईल. तसेच जी जहीरात प्रसिध्द केली होती त्याचा खर्च रू.१०,५३८/- वसूल केला जईल. अशा प्रकारची यश मोटर्सने शहरात वाहने आणलेली आहेत त्या संदर्भात त्यांना पण एक नोटीस तामील करत आहोत.

श्री. त्र्यबक तूपे :हे प्रकरण आठ ते दहा महिण्यापासून चाले आहे विलंब का लागलेला आहे. यात महापालिकेचे अधिकारी दोषी नाहीत का?ज्या वेळेस मी पत्र दिले त्यानंतर ती संचिका चालू झाली. श्री. वाहूळ यांचे समोर शेटी राहतात. सर्व मिळून हे काम झालेले आहे.तीन गाडया नसून २५ गाडयाचे प्रकरण आहे. तो व्यक्ती घाणेगाव येथे राहत नाही चूकीची माहिती दिली हे सर्व माहिती असतांना विलंब का लागलेला आहे.

मा.सभापती :कार्यवाहीस विलंब का लागलेला आहे व उर्वरीत वाहनाच्या बाबतीत का कार्यवाही केली नाही.

उपआयुक्त(महसूल) : साधारणत: सप्टेंबर मधे हे प्रकरण प्रशासनासमोर आले सदर व्यक्तीने जे पत्ता दिला होता त्याची चौकशी केली असता तो तेथे रहात नाही असे कळले ही व्यक्ती शहरातच राहते. ही व्यक्ती कोठे रहाते त्यासाठी मतदार यादी तपासणी करावी लागली. या दोन बाबी जेंव्हा समोर आल्या तेंव्हा तिसरी गाडी संबधीत व्यक्तीने आरटीओ पासींग साठी ठेवलेली आहे आरटीओ अधिकाऱ्यांना विनती केल्यानंतर सदरील गाडीचे पासींग सूध्दा झालेले नाही. गेल्या १० ते १२दिवसात वेगाने काम करून हे प्रकरण अंतिम टप्प्यात आलेले आहे.

मा. सभापती : विनाविलंब कार्यवाही अपेक्षित आहे.

श्री. त्र्यबंक तूपे :आरटीओ विभागाकडून या लोकांचे खरे पत्ते काढावे चूकीचे पत्ते हे लोक देतात. मतदान यादी ही महापालिकेकडे आहे. सदर पत्ता हा पाच महिण्यापासून प्रशासनाकडे आहे.२५ गाडयाचा हा प्रश्न आहे. महापालिकेस २५ ते ३० लक्षचा फायदा होवू शकतो.

मा. सभापती : सूचनांवर कार्यवाही अपेक्षित आहे.

श्री. रविकांत गवळी :गेल्या चार पाच दिवसापासून दैनिकामधे भूखंड घोटाळा बध्दल येत आहे. आणि जे २१८ भूखंडावर घोटाळे झालेले आहे याबद्दल मी सूध्दा आपल्याशी चर्चा केली होती. दोन दिवसापूर्वी मी मा.सभापती यांना पत्र दिले की, रविद्रनगर टिळकनगर बागशेरजंग भागात सर्वे नं. १७ मधे सिटीएस नगर १५८४९ मधे हा लेआऊट मधील खूला भूखंड आहे. तो महापालिकेचा असून पी. आर कार्ड आज महानगरपालिकेच्या नावाने नाही. आणि त्या जगेवर संबधीत व्यक्तीला बांधकाम परवानगी सूध्दा दिली आहे. या संदर्भात सविस्तर माहिती दयावी.

मा. सभापती : या संदर्भाने संबधीत अधिकारी यांनी खूलासा करावा.

सहा.संचालकनगररचना : सीटी सर्वे क्र.१५८४९/अ २२८ सीट क्र १४८ बागशेरजंग दाऊदपूरा औरंगाबादच्या अभिन्यास मधील भूखंड आहे. या जगेवर बाधंकाम परवानगीचा प्रस्ताव १९९९-२००० पासून वारंवार येत होता. चार पाच वेळेस परवानगी नाकारली होती. त्यामूळे संबधीतांनी शासनाकडे कलम ४७ नूसार अपील केले होते. आणि शासनाने १७ ऑगस्ट २००४ ला तेथे बांधकाम परवानगी दयावी म्हणून आदेश दिले होते. त्यानूसार २ नोव्हेंबर २००४ रोजी बांधकाम परवानगी दिली.

श्री. रविकांत गवळी :शासनाने बांधकाम परवानगी देण्याचे कळविले तर प्रशासनाने शासनास त्या बाबतीत काही कळविले का ?की हे डिसपूट मॅटर आहे खूला भूखंड आहे. शासनास सर्व सत्यपरीस्थिते कळविली होती का.

सहा.संचालक नगररचना :या बाबत मा. राज्यमंत्री यांचेकडे सूनावणी झाली होती. यात महापालिकेचे प्रतिनिधी व शासनाचे प्रतिनिधी हजर होते आणि शासनाचे आदेश आहे की बांधकाम परवानगी दयावी. शासनास सर्व सत्यप्ररीस्थिती कळविली होती. माझ्याकडे सचिका आहे त्याच्या छायाप्रति आपणांस देण्यात येतील. न्याय प्रविष्ठ प्रकरण आहे ॲफिडेव्हिट दिलेले आहे.

श्री. रविकांत गवळी : ॲफिडेव्हिट काय दिलेले. आहे. बांधकाम परवानगी आता खंडीत केलेली आहे की चालू आहे. की बांधकाम पूर्ण झालेले आहे.

मा. सभापती : प्रतिज्ञा पत्र काय दिलेले आहे.

सहा.संचालक नगररचना : न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे तेथे. रेखांकनातील ओपनस्पेस आहे असे आपण म्हटलेले आहे.

श्री. रविकात गवळी : असे असतांना बांधकाम परवानगी का दिली.सत्य परीस्थिती शासनास कळविली असतील तर शासनाने परवानगी दिलीच नसती असे माझे मत आहे.

सहा.संचालक नगररचना : शासनाने परवानगी दिली म्हणून महापालिकेने परवानगी दिली.

मा. आयुक्त :वस्तूस्थिती लपविली का हे सर्व कोर्टात निघेलच. दोन बाबीची काळजे घ्यावी लागेल की शासनास वस्तूस्थिती कळविली होती का आणि कोर्टाला पण कळविली आहे का.

मा. सभापती : हे प्रकरण न्यायालयात आहे. विधी विभागास सूचना करण्यात येत आहे की या बाबतीत तज्ज्ञ नामांकित वकीलाची नियुक्ती करून, ती महानगरपालिकेची खुली जगा आहे. त्या संदर्भात महापालिकेच्या बाजूने कसा निकाल लागेल या बाबतीत प्रयत्न करावे.

मा. आयुक्त : २१८ जगेच्या संदर्भात खूलासा करतो की. आता सध्या जी मोहिम चालू आहे ती रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्याची चालू आहे. मा.हायकोर्टाचे तसे आदेशही आहेत. यानंतर एक वर्षात तक्रारी आलेल्या आहेत ते सर्व एकत्रित केले त्यात २१८ प्रकरणे होती. या जगेवर अतिक्रमण आहे की नाही म्हणून दोन टीम करून पाहणी चालू आहे. २१८ जगेवरील अतिक्रमणे काढली जईल. पावसाळयात फक्त रहाते घर काढता येणार नाही.

श्री. रविकांत गवळी :या प्रकरणाचा सविस्तर खुलासा मा.सभापती यांनी घ्यावा.

मा. सभापती : ठिक आहे बैठक संपल्या नंतर संबधीत अधिकारी यांनी संचिका माझ्या कॅबीनमधे आणावी तेथे चर्चा करू.

श्री. त्र्यंबक तूपे : पावसाळयाचे दिवस असून केंव्हा आपतकालीन परीस्थिती निर्माण होवू शकते त्यासाठी अग्निशमन विभागास जेआवश्यक साहित्य पाहिजेते खरेदी केले आहे की नाही खूलासा करावा.

मा.सभापती :या संबधी खूलासा करावा.

मुख्य अग्निशमन अधि. :मागिल दोन पावसामधे या विभागाकडे झाडे पडल्याचे तसेच घरात पाणी गेल्याचे कॉल आलेले आहे. मा.आयुक्तांच्या मान्यतेने पंप खरेदीचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे. सध्या आदेश स्थगित आहे. दुसरा कटर खरेदीचा आहे. तसेच बुट, जॅकेट खरेदीचा आहे. स्थायी समिती समोर प्रस्ताव येणार होता. परंतू आला नाही. जॅकेट खरेदीला मा. आयुक्तांनी मान्यता दिली आहे.

मा.सभापती :आपतकालीन परीस्थितीत या विभागाला लागणारे सर्व साहित्याच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र.32 :**

दिनांक 26-5-2006(कार्यक्रम पत्रिका क्र.04) व दि. 07-06-2006(कार्यक्रम पत्रिका क्र.05) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक 26-5-2006 व दि. 07-06-2006 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.33 :**

(दि.26.5.2006 रोजी च्या सभेतील विषय क्र.25 पुढील सभेत ठेवण्याच्या निर्णयानुसार महागाई भत्त्यासंबंधीचा प्रस्ताव पुन्हा सादर. प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालीलप्रमाणे आहे.)

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/११०६/प्र.क्र.५/सेवा-९ मंत्रालय, मुंबई दि.९ मे २००६ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दि.१ मे २००६ महागाई भत्ता वाढ ३% मंजूर केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दि.१.५.२००६ पासून महागाई भत्ता २१% ऐवजी २४% अदा करण्यासाठी प्रती माह रू.७.८३ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात वेतन व भत्ते अदा करण्यासाठी स्वतंत्र तरतुद करण्यात आलेली आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना मे २००६ च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात २१% ऐवजी २४% महागाई भत्ता समाविष्ट करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री. मधुकर सांवत :महानगरपालिकेचा दर्ज क वर्गातून ड मधे गेला नियमानूसार महागाई भत्ता देवू शकतो का याचा आयुक्तांनी खूलासा करावा. स्थगित ठेवावा पूढील बैठकीत सविस्तर माहिती घ्यावी.

मा.सभापती :सविस्तर माहितीसह पूढील बैठकीत ठेवण्यात यावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव पुढील सभेत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.34 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नुतन कॉलनी ते विवेकानंद चौक व समतानगर येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार र.रू.17,82,600/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च 2006-07 या आर्थिक वर्षात शहरी भागात पुन:र्डांबरीकरण या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

तरी रक्कम रूपये 17,82,600/- चे अंदाजपत्रकाचा व निविदा काढण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नुतन कॉलनी ते विवेकानंद चौक व समतानगर येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.17,82,600/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.35 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, सावरकर चौक ते निराला बाजार व्हाया एस.बी.कॉलेज या रस्त्याचे सौंदर्यीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.77,81,930/- चे असून या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण 3 भरलेली निविदापत्रके प्राप्त झाली. सदर निविदांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| 1. श्री. एम.ए.सिद्यीकी | 23% जास्त दराने |
| 2. मे. ए.एस.कन्स्ट्रक्शन | 30% जास्त दराने |
| 3. मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 75.75% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा श्री.एम.ए.सिद्यीकी यांची असून ती अंदाजपत्रकीय दरापेक्षा 23% जास्त दराने आहे. मुळ अंदाजपत्रक सन 2004-05 च्या दरसूची प्रमाणे आहे. सन 2005-06 प्रमाणे तुलना केली असता त्याचे दर 3.66% जास्त येत आहे. त्यानुसार समक्ष वाटाघाटी केली असता गुत्तेदाराने 1% दर कमी करण्याचे मान्य केले. त्यान्वये मुळ अंदाजपत्रका प्रमाणे 22% जास्तीचे दर हे सुधारीत अंदाजपत्रकान्वये 2.66% जास्तीचे दर राहतील. तरी सदरील 22% जास्त दराची निविदा मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव पाठविण्याची मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. तरी श्री.एम.ए.सिद्यीकी यांची निविदा मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सावरकर चौक ते निराला बाजार व्हाया एस.बी.कॉलेज या रस्त्याचे सौंदर्यीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.एम.ए.सिद्यीकी यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अं.प.दरापेक्षा 22% जास्त (सुधारीत अंदाजपत्रकान्वये 3.66% जास्त दराऐवजी 2.66% जास्त) दराने करून घेण्यास सर्वानुमे मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

मा.सभापती : ऐनवेळचे सर्व प्रस्तावांना मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.36 :**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील याचिका क्र.1146/93 अंतर्गत मेसर्स एच.एम.टी. लि., एम.आय.डी.सी. चिकलठाणा, औरंगाबाद यांनी आयात केलेल्या "ट्रॅक्टर्स" या मालावरील जकात रक्कम रू.11,19,313/- चा जकात परतावा बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ करण्यात आलेले होते. सदर प्रकरणात महानगरपालिकेचे विधिज्ञ यांनी सदरील कंपनीचे जकात परतावा प्रकरणातील याचिका क्र.1146/93 अंतर्गतचा निकाल महानगरपालिकेच्या विरूध्द लागल्यास त्यापासून महानगरपालिकेस व्याजासह रक्कम जवळपास रू.60 ते 66 लाख एवढी रक्कम कंपनीस परत द्यावे लागतील. त्यापेक्षा न्यायालया बाहेर तडजोड करून भविष्यात महानगरपालिकेचे होणारे आर्थिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने सदरील न्यायप्रविष्ठ प्रकरणामध्ये संबंधीत कंपनी बरोबर बोलणी करण्यात येऊन दि.19.6.2006 रोजी मा.उच्च न्यायालयात "Consent Terms" दाखल करून जकात कर परताव्याची निव्वळ रक्कम रू.11,19,313/- परत केल्यास होणरे व्याज कंपनी मागणार नाही या अटीवर तडजोड करण्यात येवून प्रकरण दोन्हीही पार्टीच्या विधीतज्ज्ञांच्या सहमतीने मा.उच्च न्यायालयातून काढून घेण्याचे ठरले. त्यानुसार मा.न्यायालयात यासंबंधीची संपूर्ण प्रशासकीय कार्यवाही करण्यात आलेली आहे.

करिता वरीलप्रमाणे याचिका क्र.1146/93 अंतर्गत असलेल्या जकात परताव्याची मुळ रक्कम रू.11,19,313/- चा परतावा संबंधीत कंपनीस देणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**संवाद :**

मा.आयुक्त : या संदर्भात खूलासा असा की १९९० ते १९९२ मधे एचएमटी कंपनी आली होती. तेंव्हा जेकाही ट्रॅक्टर यायचे ते १०० टक्के ट्रॅक्टर एक्पोर्ट होत होते. आपण १० टक्के जकात घ्यावयास पाहिजे त्यावेळी १०० टक्के घेतले आणि जेंव्हा त्यांनी ९० टक्के परतावा मागविला तो दिला नाही म्हणून प्रकरण कोर्टात गेले. ते मॅटर फायनल स्टेजला आता आले. निर्णय महापालिकेच्या विरोधात गेला असता तरी ठिक आहे ६० ते ७० लक्ष रूपये लागले असते. एक फारच महत्वाची बाब आहे, ज्यामूळे मी वाटाघाटी केली त्याच दिवशी कोर्टात सांगितले की वाटाघाटी करीत आहे. ११ लक्षच दिले नसता जस्त रक्कम लागली असती. कोर्ट या मुद्यावर आले की, आम्ही मोटर व्हइकल्सला ९० टक्के परत करणार नाही. जे आम्ही २२.२. मधे केले आहे तो कन्ट्रन्टल आहे का जर कोर्टाने ते ठरवले असते तर महापालिकेला दर वर्षाला २/३ कोटी बोज पडला असता. मी त्या कंपनीला सांगितले भांडण करू नका महापालिका १०० टक्के ११ लक्षचा परतांवा करेल, व्याजमागवू नये. यामूळे ४० ते ५० लक्षचा फायदा झाला ते तर वेगळेच आहे. परंतू जर कोर्टाचा आदेश झाला असता प्रत्येक व्हिकल्स ९० टक्के परत करणे म्हणजेमहानगरपालिकेला मोठा बोज पडला असता. म्हणून मी वाटाघाटीने निर्णय घेतला आहे.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील याचिका क्र.1146/93 अंतर्गतच्या तडजोडीनुसार मेसर्स एच.एम.टी. लि., एम.आय.डी.सी. चिकलठाणा, औरंगाबाद यांनी आयात केलेल्या "ट्रॅक्टर्स" या मालावरील जकात रक्कम रू.11,19,313/- च्या जकात परताव्याची निव्वळ र.रू.11,19,313/- संबंधीत कंपनीस देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.37 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका वॉर्ड अ, ब, क आणि ई मधील मिळकतींचे संगणकीकरण करणे तसेच वॉर्ड 'ड' आणि 'फ' मधील मिळकतींचे अपडेशन संगणकीकरण करणेची तयारी मे.सारंग इंटरप्राईजेस, उल्कानगरी औरंगाबाद या संस्थेने दर्शविलेली आहे. सदरील वॉर्डातील मिळकतींचे संगणकीकरण केल्यास त्या वॉर्डातील मिळकतींचे

मिळकतनिहाय मागणी, वसुली तात्काळ प्राप्त होवू शकेल, त्यामुळे मिळकतधारकांना मागणी नोटीसा देणे शक्य होईल. खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मे.सारंग इंटरप्राईजेस यांना वॉर्ड अ, ब, क आणि ई मधील मिळकतींचे संगणकीकरण करणे तसेच वॉर्ड 'ड' आणि 'फ' मधील मिळकतींचे अपडेशन संगणकीकरण करण्याचे काम देणे योग्य राहील.

1. संस्थेने मिळकतींचे संगणकीकरण करण्यासाठी सॉफ्टवेअर डेव्हलप करावे.
2. वॉर्ड अ, ब, क आणि ई मधील मिळकतींचे संगणकीकरण करणे तसेच वॉर्ड 'ड' आणि 'फ' मधील मिळकतींचे अपडेशन संगणकीकरण करण्यासाठी संबंधीतास रू.3 लक्ष मावेजा देण्यात येईल.
3. महानगरपालिका सदरील संस्थेस संपूर्ण मिळकतींचे/रजिस्टरचे झेरॉक्स करून देईल, त्याचा खर्च महानगरपालिका करेल.

मालमत्ता कर :

| अ. क्र. | मालमत्ता धारकाचे नांव | पत्ता 1 | पत्ता 2 | घर क्र. | रजिस्टर क्र. | पृष्ठ क्र. | करयोग्य मुल्य | थकबाकी | थकबाकी चे वर्ष | चालू मागणी | एकूण मागणी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

4. कंपनीने तयार केलेले प्रोग्राम मनपाच्या अ ते फ मधील संगणकारवर अपलोड करून द्यावे.
5. देय रक्कमेवर नियमानुसार सेवा कर मनपाने द्यावेत.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका वॉर्ड अ, ब, क आणि ई मधील मिळकतींचे संगणकीकरण करणे तसेच वॉर्ड 'ड' आणि 'फ' मधील मिळकतींचे अपडेशन संगणकीकरण करण्याचे काम प्रस्तावात दर्शविलेल्या अ.क्र.1 ते 5 च्या अटी-शर्तीस अधिन राहून मे.सारंग इंटरप्राईजेस, उल्कानगरी, औरंगाबाद या संस्थेमार्फत करून घेण्यास व त्याप्रित्यर्थ संबंधीतास रू.3 लक्ष मावेजा देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.38 :**

कार्यकारी अभियंता (ड्रे., वि., इ. व उ.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो.ज्ञानेश्वरनगर येथे नाल्यातील प्रवाह सुरळीत वाहुन जाण्यासाठी नाला ट्रेनिंग करून दगडी गटार बांधणे या कामासाठी तयार केलेल्या एकूण रक्कम रू.12,30,000/- च्या अंदाजपत्रकापैकी भागशः झालेल्या कामाचे स्वतंत्र अंदाजपत्रक र.रू.2,30,000/- सा.बां. विभागाच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार वेगळे तयार करण्यात आले असून, त्याची रक्कम रू.2,30,000/- होत आहे. सदरील काम अर्थसंकल्प 2006-07 च्या नाला ट्रेनिंग या लेखाशिर्षातून प्रस्तावित आहे. नाल्यालगतच्या घरांच्या हापशांना दुर्गंधीयुक्त पाणी येत असून उन्हाळ्याच्या दिवसात वेळप्रसंगी हापशाच्या पाण्याचा पिण्यासाठी देखील वापर करावा लागत आहे. हे दुर्गंधीयुक्त येणारे पाणी बंद करण्यासाठी सन्माननीय नगरसेविकेने तक्रार केल्यामुळे या भागातील नाल्यांची पाहणी मा.सभापती (स्थायी समिती) यांचेसह करण्यात आली. नागरिकांच्या/स.नगरसेवकांच्या तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे मा.सभापती यांना आढळून आल्यामुळे त्या ठिकाणच्या वाहणाऱ्या नाल्यास नाला संरक्षण भिंतीचे व चॅनलायजिंगचे काम त्वरीत सुरू करण्याचे ठरले. कामाच्या अंदाजपत्रकास व काम सुरू करण्याच्या कार्यवाहीस स्थायी समितीमध्ये मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) नुसार संविदा करण्यास मान्यता देण्यात येईल अशा सूचना मा.सभापती महोदयांनी प्रत्यक्ष स्थळावर दिल्या. त्यानुसार प्रभारी आयुक्तांची दि.12.5.2006 रोजी या कामाच्या प्रकरणास मान्यता झाली. परंतु प्रत्यक्ष परिस्थितीनुरूप घटना मा.आयुक्त महोदयांकडे सादर करण्यात आले असता खालील प्रमाणे कार्यवाही करणेस निर्देश प्राप्त आहेत.

झालेल्या कामाच्या रक्कमेच्या हद्दीपर्यंतचा प्रस्ताव मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) नुसार सादर करण्यात यावा. काम आहे त्या स्थितीत थांबवावे. तसेच उर्वरीत रक्कमेच्या कामाची अल्पमुदतीची निविदा त्वरीत काढण्यात यावी. त्यानुसार उर्वरीत काम र.रू.10,00,000/- ची अल्पमुदतीची निविदा बोलवण्यात आलेली आहे आणि अं.प.रू.2,30,000/- च्या कामाचा प्रस्ताव कलम 5(2)(2) नुसार मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. सदर काम मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यात आलेले आहे. करीता र.रू.2,30,000/- ची संविदा करण्यास व झालेल्या कामाची रक्कम संबंधीतास अदा करणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.ज्ञानेश्वरनगर येथे नाल्यातील प्रवाह सुरळीत वाहुन जाण्यासाठी नाला ट्रेनिंग करून दगडी गटार बांधणे या कामासाठीच्या एकूण अंदाजपत्रक रू.12,30,000/- या रक्कमेपैकी मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) नुसार, मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून तातडीने करून घेण्यात आलेल्या र.रू.2,30,000/- च्या कामास व झालेल्या कामाची रक्कम संबंधीतास अदा करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.39 :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सुल तलाव औरंगाबाद येथे मत्स्य व्यवसाय करण्यासाठी जा.क्र.मनपा/मामअ/1371/2006, दि.15.6.2006 रोजी दुसऱ्यांदा अल्प मुदतीची निविदा स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार दि.20.6.2006 रोजी प्रत्यक्ष बोलीमध्ये तीन जणांनी भाग घेतला ते खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 1) नितीन गजानन पंडुरे | रू.4,15,000/- |
| 2) देविदास भागीरथ सलामपुरे | रू.4,00,000/- |
| 3) सचिव, बालाजी मत्स्य व्यवसाय सह.संस्था मर्यादित, लिंबे जळगांव, ता.गंगापुर | रू.4,10,000/- |

मनपाने हर्सुल तलाव, औरंगाबाद मत्स्य व्यवसाय करण्यासाठी आधारभुत किंमत रू.1,50,000/- ठेवली असता श्री.नितीन गजानन पंडुरे यांनी रू.4,15,000/- जास्तीची बोली बोलली आहे.

तेव्हा श्री.नितीन पंडुरे यांना दि.1.7.2006 ते 31.5.2011 पर्यंत मत्स्य व्यवसाय करण्यासाठी पहिल्या वर्षासाठी रू.4,15,000/- प्रती वर्ष बोली मान्य करावयाची असल्यास संबंधीताकडून बोलीच्या 50% रक्कम रू.2,07,500/- व एक लाखाची राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरंटी व पुढील चार वर्षासाठी दर

वर्षी 10% वाढीसह नुतनीकरण करून देण्याची हमी घेण्यासाठी संबंधीताचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल तलाव औरंगाबाद येथे दि.1.7.2006 ते 31.5.2011 या कालावधीत मत्स्य व्यवसाय करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदां धारकांपैकी आधारभूत किंमतीपेक्षा जास्तीची बोली बोलणारे श्री.नितीन गजानन पंडुरे यांच्या, प्रथम वर्षासाठी रू.4,15,000/- प्रतिवर्ष या बोली रक्कमेस, पुढील चार वर्षासाठी दर वर्षी 10% वाढीसह नुतनीकरण करून देण्याच्या अटीस अधीन राहून सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.40 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सुशिक्षीत बेरोजगारांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी शहरात विविध ठिकाणी गाळे/दुकाने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यामुळे शहरातील अतिक्रमणांना आळा बसू शकेल. यासाठी शहरातील नामांकीत संस्थांकडून व विकासकाकडून प्रायोगिक तत्वावर मनपाने ठरविलेल्या मॉडेलप्रमाणे दुकानांचे/गाळ्यांचे प्रस्ताव मागविणे योग्य. सुशिक्षीत बेरोजगारांना द्यावयाच्या गाळया/दुकानांबाबत अटी व शर्ती खालीलप्रमाणे असाव्यात.

1. दुकानांची साईज जास्तीत जास्त 100 चौरस फुट असेल.
2. किमान 15 अर्जदारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर गाळा/दुकान उपलब्ध करून देण्यासंबंधी मा.आयुक्त विचार करतील.
3. गाळ्याच्या किंमतीपैकी 25% रक्कम अर्जदारास स्वतःस भरावी लागेल. उर्वरीत 75% रक्कम मनपा कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देईल.
4. कर्ज रक्कमेची परतफेड पाच वर्षामध्ये संबंधीताने करणे आवश्यक आहे. कर्ज रक्कमेवर 9% अथवा मनपा वेळोवेळी कर्ज घेतील त्याप्रमाणे व्याज आकारले जाईल.
5. कर्जाची परतफेड पूर्ण होईपर्यंत सदर गाळा मनपाच्या मालकीचा असेल.
6. कर्जाची परतफेड झाल्यानंतर सदर गाळा/दुकान अर्जदारास हस्तांतरीत करण्यात येईल.
7. एकाच व्यक्तीस एकापेक्षा जास्त दुकाने दिली जावू नयेत यासाठी बायोमेट्रीक डिव्हाईसद्वारे हाताच्या अंगठ्याचे ठसे व फोटोग्राफ दोन्हीही अभिलेखावर ठेवले जातील.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद**

मा. आयुक्त : यात विषय असा की ज्या वेळी टपरी वगैरे काढली त्यावेळी ते बेरोजगार झाले त्यांचे साठी काही तरी पर्याय करून दयायला पाहिजे महानगरपालिकेकडे जे काही दूकाने होती ती वृत्तपत्रात जहीरात दिली होती. आणि जे कुणी पहिल्यांदा व जस्त बोली बोलेल त्यांना देवू असे जहीर केले. स्कीम मधे होते म्हणून स्थायी समितीकडे ते आले नाही. परंतू ॲलॉटमेंन्टच्या साठी स्थायी समितीकडे यावे लागेल. आपल्याकडे इतकी दूकाने नाही की आपण सर्वांना देवू शकू. प्रशासनाचे असे मत आहे की एकाच जगेवर २०० दूकाने बांधकाम केले तर ते बांधण्यास वेळ लागेल व बरेच दिवस तसेच पडून राहतील ते वाटप होत नाही. लिलाव होत नाही किंवा इतर अडचणी येतात. एकाच जगेवर बाधंण्या ऐवजे जे लोक टपऱ्या टाकून बसले होते. त्याची शहरात फारशी गरजआहे. अशी स्कीम करीत आहे की २० दूकानाचे स्टॅण्डर्ड मॉडल करीत आहे. तसेच वृत्त्पत्रात हे पण देणार की अशा प्रकारचे दूकाने मॉडेल ज्या काही नामांकित संस्था करून देतील त्यांनी त्याची किमंत नमूद करायची त्यानंतर जे१०-१५ लोक येतील त्यात निगोशिएशन करून किंमत ठरवून घेणार. वृत्तपत्रात देणार की इतक्या जगेवर इतके लोक आलेले आहे ज्या अर्जकरावयाचा असेल त्यांनी अर्ज करावा. त्या जगेवर लोकांची मागणी आली तर महापालिकेने मध्यस्थी म्हणून काम करायचे आहे. २० ते २५ टक्के डायरेक्ट ते लोक काम करून घेतील उर्वरीत ७५

टक्के महापालिका टाकेल दूकान महापालिकेच्या नावावर येईल. त्यांचे अॅटोमॅटीक अलॉट मेन्ट होतील. चार पाच वर्षानंतर ते दूकान त्यांचे नावावर देवू एकाच व्यक्तीला दोन दुकाने दिल्याजणार नाही याची दखल घेतली जईल.

श्री. त्र्यंबक तूपे : आपले सजेशन चांगले आहे परंतू शहरात बऱ्याच ठिकाणी गाळे पडून आहे. हेल्थक्लब आहे. समाजमंदीर आहे. व्यायाम शाळा आहे त्या इमारतीची तूटपूट होत आहे. तेथे जनावरे असतात. कूणी सामाजिक संस्था घेणार असेल तर देण्यात यावे. जफरगेट येथे आजही ९ ते १० गाळे पडून आहे. जेदर आहे ते वाढवून दिले आहे तेथील लोकांना परवडेल असे दर करावे.

श्री. मुजीब खान : सिध्दार्थ गार्डन येथे जेअपंग लोकांसाठी टपरी तयार करून दिली होती. त्यांना ते ३० ते ४० हजर रूपये मधे पडत आहे. १० हजर पर्यतचा त्याचा व्यवसाय तो सुरू करू शकतो एवढी मोठी रक्कम ते कोठून देणार आहे. त्यांचेकडून ३-३ हजर रूपये भाडे घेतले त्या लोकांचे तेथे काहीही नाही. त्याचा व्यवसाय सूरू नाही तरी भाडे घेतले.

मा.आयुक्त :२० ते २२ लोक आहे. त्यांना सबसिडी दिली जईल, उर्वरीत बँकेकडून रक्कम उपलब्ध होईल.

श्री. साहेबराव कावडे :चिकलठाणा येथे भाजी मार्केटसाठी गेल्या ५ ते ६ वर्षापासून गाळे बांधलेले आहे. भाजी वाले लोकांना ते गाळे उपलब्ध करून दिले नाही. तेथील गाळयाची ताबडतोब दुरूस्ती करून भाजी विक्रेत्याला गाळे देण्याची विनंती करतो.

मा. सभापती : या बाबतीत प्रशासनाने ताबडतोब कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.

श्री. साहेबराव कावडे : चिकलठाणा येथे महापालिकेच्या शाळेच्या इमारतीमधील गाळे दोन वर्षापूर्वी भाड्याने दिले त्यांना जस्त भाडे आहे. ते कमी दराने देण्यात यावे. ज्यांना दिले त्यांना योग्य ते भाडे लावण्यात यावे.

मा. सभापती : सर्वांना समान भाडे आकारण्यात यावे. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. प्रशासनाने सुशिक्षीत बेरोजगारांना हे गाळे देण्याची कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सुशिक्षीत बेरोजगारांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी शहरात विविध ठिकाणी गाळे/दुकाने उपलब्ध करून देण्याकरीता शहरातील नामांकीत संस्थांकडून व विकासकाकडून प्रायोगिक तत्वावर मनपाने ठरविलेल्या मॉडेलप्रमाणे दुकानांचे/गाळयांचे प्रस्ताव मागविणेस तसेच प्रस्तावात दर्शविलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून सुशिक्षीत बेरोजगारांना दुकाने/गाळे उपलब्ध करून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.41 :**

मा.आयुक्त यांची व भाडे समितीच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो. शहागंज येथील महानगरपालिकेचे झोन कार्यालय (जुने) पहिला मजला कु.दिपा मांगीलाल पारख या अपंग महिलेस भाड्याने देणे बाबत नियमाप्रमाणे चटई क्षेत्रफळ 73.50 चौ.मी. करीता अनामतरक्कम रू.1500/- प्रति चौ.मी. या प्रमाणे रू.1,10,250/- तर भाडे रक्कम रू.64/- प्रति चौ.मी. प्रति माह याप्रमाणे रू.4704/- प्रति माह आकारणे योग्य. तसेच या जागेचा मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो अर्जदारास भाड्याच्या व्यतिरिक्त भरणा करणे व सेवाशुल्क रू.5/- प्रति चौ.मी. याप्रमाणे आकारणे योग्य.

तरी भाडे समिती व मा.आयुक्त यांच्या भाडे व अनामत रक्कम यास मंजुरी दिल्यानुसार उक्त ठिकाणची जागा भाड्याने देणे करीता प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. शहागंज येथील महानगरपालिकेचे झोन कार्यालय (जुने) पहिला मजला, नियमाप्रमाणे चटई क्षेत्रफळ 73.50 चौ.मी. करीता अनामत रक्कम रू.1500/- प्रति चौ.मी. या प्रमाणे रू.1,10,250/- तर भाडे रक्कम रू.64/- प्रति चौ.मी. प्रति माह याप्रमाणे रू.4704/- प्रति माह आकारून, प्रस्तावातील इतर अटी-शर्तीस अधीन राहून कु.दिपा मांगीलाल पारख या अपंग महिलेस भाड्याने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.42 :**

नगर सचिव विभागातील विविध समित्यांचे इतिवृत्त/विषयपत्रिका तसेच तद्नुषंगीक कार्यालयीन कामे आऊट सोर्सींगने करून घेण्यासाठी मा.आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. सदरील काम डी.टी.पी., एम.एस.ऑफीस कॉम्प्युटर कोर्स पुर्ण केलेले गोपाल प्रभाकर पाटील, रा. ४, विकासनगर, पवन गॅस एजन्सीशेजरी, उस्मानपुरा, औरंगाबाद यांचेकडून टंकलेखनाचे काम (कॉम्प्युटरसह) मासिक रक्कम रू.५०००/- एवढ्या मोबदल्यात खालील अटी-शर्तीस अधिन राहून काम करून घेण्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी ठेवण्यास मा. आयुक्तांनी शिफारस केलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**अटी-शर्ती :**

१. सदरील काम हे आऊट सोर्सींगने करून घ्यावयाचे असून केवळ ११ महिन्यांकरीता सदरचे काम संबंधीताकडून करून घेण्यात येईल.
२. मनपामध्ये नोकरी मागण्याचा कोणताही अधिकार संबंधीतास राहणार नाही.
३. सदरील कामाकरीता श्री.गोपाल प्रभाकर पाटील हे स्वत:चे कॉम्प्युटर व प्रिंटर मनपा कार्यालयात आणून त्यांना दिलेले काम निहीत वेळेत पूर्ण करून देतील.
४. नगर सचिव यांनी वेळोवेळी दिलेले टंकलेखनाचे काम दिलेल्या वेळेपुर्वी पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधीतावर राहील.
५. काम समाधानकारक असल्याबाबत प्रत्येक महिन्यात नगर सचिव यांनी प्रमाणपत्र दिल्यानंतर संबंधीतास ठरविण्यात आलेला मोबदला रक्कम रूपये ५०००/- लेखा विभागामार्फत अदा करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगर सचिव विभागातील विविध समित्यांचे इतिवृत्त/विषयपत्रिका तसेच तद्नुषंगीक कार्यालयीन कामे आऊट सोर्सींगने करून घेण्यास तसेच सदरील काम श्री.गोपाल प्रभाकर पाटील, रा.4, विकासनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद यांचेकडून टंकलेखनाचे काम (कॉम्प्युटरसह) मासिक रक्कम रू.5000/- इतक्या मोबदल्यात प्रस्तावातील अटी शर्तीस अधीन राहून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.43 :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जाधववाडी येथील कडबा मार्केटसाठी खडी रस्ता तयार करणे या कामाचे सा.बां.खात्याच्या सन 2005-2006 च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक र.रू.5,95,560/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात शहरी भागात वाहतुक नगर विकसित करणे या लेखाशिर्षकातून करण्यात येत आहे. सदर का हे शहरात असलेले कडबा मार्केट जलद गतीने जाधववाडी येथील नवीन मोंढा येथे स्थलांतरीत करावयाचे आहे. त्यासाठी सदर रस्त्याचे काम करणे तातडीचे असल्यामुळे प्रस्तावित काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5(2)(2) अन्वये उपलब्ध गुत्तेदार अमित कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्याच्या प्रस्तावास मा.आयुक्तांनी मंजूरी देवून मा.स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यास शिफारस केलेली आहे.

तरी प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाधववाडी येथील कडबा मार्केटसाठी खडी रस्ता तयार करणेसाठी तयार केलेल्या र.रू.5,95,560/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे मुं.प्रां.मनपा अधि.1949 चे कलम 5(2)(2) अन्वये उपलब्ध गुत्तेदार अमित कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.44 :**

कार्यकारी अभियंता(ज.नि., वि.,इ. व उद्याने) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, विद्युत विभागातील जुने साहित्य (Scrap Material) विकण्याचे अंदाजपत्रक अधिक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम खाते, औरंगाबाद यांचेकडून रक्कम रूपये 5,76,000/- चे तयार करून घेण्यात आले असून, सदरचे साहित्य विकण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करून दर मागविण्यात येतील. महानगरपालिकेच्या सर्वात फायद्याच्या देकारास मान्यता घेवून साहित्याची विल्हेवाट लावण्यात येईल. सदरच्या प्रस्तावास दि.20.6.2006 रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

करीता जुने साहित्य जाहिरातीद्वारे विकण्याच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्युत विभागातील जुने साहित्य (Scrap Material) विकण्याकरीता जाहिरातीद्वारे निविदा मागवून सदरील साहित्य विकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 45 :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या व्यापारी संकुलातील गाळे भाडेतत्वावर देण्यासाठी दिनांक 20.6.2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात आली होती.

त्यानुसार मोहल्ला सब्जीमंडी (सिल्लेखाना) येथील दुकान क्र.2 रिक्त असून ते सुशिक्षित बेरोजगार व अंध अपंग यांच्यासाठी राखीव आहे. सदरील दुकानाकरीता खालील प्रमाणे एकूण तीन अर्ज प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | अर्ज दाखल करण्याची तारीख/वेळ | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | आशा कांतीलाल सुर्यवंशी | दि.20.6.2006/दुपारी12.10 वा. | सुशिक्षित(एम.ए.) अपंग महिला |
| 2 | वि. स. राजपुत | दि. 20.6.2006/दुपारी 3.45 वा. | सुशिक्षित व अपंग असल्याबाबत कागदपत्र दाखल केलेले नाही. |
| 3 | अर्चना अशेक जैन | दि. 21.6.2006/दुपारी 1.00 वा. | सुशिक्षित (एम.कॉम. दुसरे वर्ष) अपंग महिला |

जा.क्र.मनपा/मामअ/712/2006, दि.19.6.2006 अन्वये दि.20.6.2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात दिलेल्या जाहीर प्रगटना नुसार गाळे वाटप करतांना प्रथम अर्ज येणाऱ्या व्यक्तीस प्रथम प्राधान्य देण्यात येईल. त्यानुसार आशा कांतीलाल सुर्यवंशी यांचा अर्ज प्रथम प्राप्त झाला आहे.

सिध्द शिघ्र गणकानुसार (Ready Reckoner) भाडे रक्कम रू.42/- प्रती चौ.मी.प्रती माह व अनामत र.रू.1500/- प्रती चौ.मी. इतके येणे आवश्यक आहे. सदरील जागा ही मुख्य रस्त्यावर असल्यामुळे दुकानाचे महत्व पाहता भाडे रक्कम रू.150/- प्रती चौ.मी. प्रती माह व अनामत रक्कम रू.4000/- प्रती चौ.मी. ठेवणे योग्य. तसेच या दुकानदारास (1) जागेचा मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो अर्जदारास भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल. (2) सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह भरावे लागेल.

तरी आशा कांतीलाल सुर्यवंशी यांना सदरचा गाळा वाटप करण्याबाबत मान्यता मिळाल्यास सदरील दुकानाची अनामत रक्कम भरून अटी शर्तीनुसार करारनामा करून ताबा देण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सब्जीमंडी (सिल्लेखाना) येथील सुशिक्षित बेरोजगार व अंध अपंग यांचे साठी राखीव असलेले दुकान क्र.2 भाडेतत्वावर देण्यासाठी मागविण्यात आलेल्या अर्जानुसार प्रथम अर्ज प्राप्त झालेले अर्जदार आशा कांतीलाल सुर्यवंशी यांना सदरील दुकान, भाडे रक्कम रू.150/- प्रती चौ.मी. प्रती माह व अनामत रक्कम रू.4000/- प्रती चौ.मी. तसेच (1) जागेचा मालमत्ता कर, (2) सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह अर्जदाराने भरावा या व इतर अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 46 :**

उप आयुक्त (महसूल), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या व्यापारी संकुलातील गाळे भाडेतत्वावर देण्यासाठी दिनांक 20.6.2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात आली होती.

त्यानुसार मोहल्ला गारखेडा येथील महानगरपालिकेचे मालखरे क्लासिक व्यापारी संकुलातील दुकान क्र.2 क्षेत्रफळ 10.5 चौ.मी. हे खुल्या वर्गासाठी रिक्त आहे. सदरील दुकानाकरीता खालील प्रमाणे एकूण दोन अर्ज प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | अर्ज दाखल करण्याची तारीख/वेळ | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | विजय पांडुरंग शिंदे | दि.20.6.2006/सकाळी 11.45 वा. | |
| 2 | वि. स. राजपुत | दि. 20.6.2006/दुपारी 3.44 वा. | |

जा.क्र.मनपा/मामअ/712/2006, दि.19.6.2006 अन्वये दि.20.6.2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात दिलेल्या जाहीर प्रगटना नुसार गाळे वाटप करतांना प्रथम अर्ज येणाऱ्या व्यक्तीस प्रथम प्राधान्य देण्यात येईल. त्यानुसार विजय पांडुरंग शिंदे यांचा अर्ज प्रथम प्राप्त झाला आहे.

भाडे समितीच्या मान्यतेनुसार भाडे रक्कम रू.207/- प्रती चौ.मी.प्रती माह व अनामत र.रू.2500/- प्रती चौ.मी. इतके ठेवणे योग्य. तसेच या दुकानदारास (1) जागेचा मालमत्ता कर जो नियमाप्रमाणे येईल तो अर्जदारास भाड्याच्या व्यतिरिक्त भरावा लागेल. (2) सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह भरावे लागेल.

तरी विजय पांडुरंग शिंदे यांना सदरचा गाळा वाटप करण्याबाबत मान्यता मिळाल्यास सदरील दुकानाची अनामत रक्कम भरून अटी शर्तीनुसार करारनामा करून ताबा देण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील महानगरपालिकेचे मालखरे क्लासिक व्यापारी संकुलातील खुल्या वर्गासाठी रिक्त असलेले दुकान क्र.2 भाडेतत्वावर देण्यासाठी मागविण्यात आलेल्या अर्जानुसार प्रथम अर्ज प्राप्त झालेले अर्जदार विजय पांडुरंग शिंदे यांना सदरील दुकान, भाडे रक्कम रू.207/- प्रती चौ.मी. प्रती माह व अनामत रक्कम रू.2500/- प्रती चौ.मी. तसेच (1) जागेचा मालमत्ता कर, (2) सेवा शुल्क रू.5/- प्रती चौ.मी. प्रती माह अर्जदाराने भरावा या व इतर अटी शर्तीनुसार भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. 47 :**

मा.आयुक्तांच्या मान्यतेने अग्निशमन विभाग, महानगरपालिकेसाठी आपत्कालीन व्यवस्थापन योजनेमध्ये काम करणेसाठी इन्फ्लेटेबल लाईफ बोट्स (1 नग) व जॉन्सर्ड चेन सॉ (3 नग) खरेदी करण्याचा प्रस्ताव स्थायी समिती समोर आर्थिक मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे. सदरील साहित्य खरेदीसाठी एकूण रक्कम रू.15,15,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : अग्निशमन विभागाकरीता आवश्यक साहित्य खरेदीसाठी लागणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात येते. त्वरीत निविदा काढाव्यात.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेसाठी आपत्कालीन व्यवस्थापन योजनेमध्ये काम करणेसाठी इन्फ्लेटेबल लाईफ बोट्स (1 नग) व जॉन्सर्ड चेन सॉ (3 नग) खरेदी करण्याकरीता रक्कम रू.15,15,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगिता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद